# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

## दिनांकः22.06.2025 वारःरविवार

---

1.जागतिक अशांतता, अस्थिरतेच्या काळात योग शांततेच्या मार्गाची वाट दाखवत असल्याचं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

2.देशासह महाराष्ट्रात११वाजागतिक योगदिन विविध उपक्रमांद्वारे उत्साहात साजरा

3.भारत, पाकिस्तानसोबतचा सिंधू पाणी करार कधीही पुनःस्थापित करणार नाही, गृहमंत्री अमित शहा यांचं स्पष्टीकरण.

4.गंभीर उल्लंघनांबद्दल तीन अधिकाऱ्यांना काढून टाकण्याचे डीजीसीएचे एअर इंडियाला निर्देश.

5.इराण-इस्रायल संघर्षात अमेरिकेचा हस्तक्षेप, अमेरिकेचा इराणच्या तीन आण्विक तळांवर हल्ला

6.अँडरसन - तेंडुलकर करंडकाच्या पहिल्या क्रिकेट सामन्यात भारताच्या पहिल्या डावातील 471 धावांना इंग्लंडचं संयमित उत्तर

**<u>पंप्रविशाखापट्टणम्</u>**

जागतिक पातळीवर विविध देशांमधील वाढता तणाव, अशांतता आणि अस्थिरतेचे वातावरण असताना, योग हा शांततेच्या मार्गाची वाट दाखवत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. अकराव्या जागतिक योग दिनानिमित्त विशाखापट्टणम् इथं आयोजित समारोहाचे नेतृत्व करत त्यांनी उपस्थितांना संबोधित करताना ते बोलत होते. पंतप्रधानांनी जागतिक समुदायाला, मानवतेसाठी योग अभ्यासाच्या दुसऱ्या टप्प्याची सुरूवात म्हणून साजरा करण्याचे आवाहन केले, जेणेकरून अंतर्गत शांतता हे जगाचे धोरण होईल. योग हा वैयक्तिक सरावाचा भाग राहिला नसून तो जागतिक सहभागाचे माध्यम म्हणून उदयाला आला असे सांगून ते म्हणाले....

**<u>मोदी बाईट १</u>**

योग से हमें शांति की दिशा मिलती है. मैं विश्व समुदाय से आज के इस महत्वपूर्ण अवसर पर एक आग्रह करूंगा. लेट दिस योगा डे मार्क द बिगनिंग ऑफ योगा फॉर ह्यूमानिटी टू प्वाइंट ओ, वेन इनर पीस बिगेन ग्लोबल पॉलिसी.

आधुनिक संशोधनाच्या माध्यमातून योग विज्ञानाला जागतिक स्तरावर बळ मिळण्यासाठी देशाचे प्रयत्न अधोरेखित केले.  पंतप्रधानांनी देशातील प्रमुख वैद्यकीय संस्था योग संशोधनामध्ये सक्रीय असल्याचे सांगितले. याचा उद्देश समकालीन निदान उपचारांमध्ये योगची समर्पकता प्रस्थापित करणे असा असल्याचं सांगून पंतप्रधान म्हणाले...

**<u>मोदी बाईट २</u>**

योग की वैज्ञानिकता को आधुनिक चिकित्सा पद्धति में स्थान मिले, ये हमारा प्रयास है। हम देश के मेडिकल और रिसर्च इंस्टीट्यूशन्स में, योगा के क्षेत्र में एविडेंस बेस्ड थेरेपी को भी प्रोत्साहित कर रहे हैं. इस दिशा में दिल्ली के एम्स की रिसर्च में सामने आया है कि योग की कॉर्डियक और न्यूरोलॉजी डिस्ऑर्डर्स के उपचार और वूमन हेल्थ और मेंटल वेल-बींग में अहम भूमिका है.

या वर्षाच्या योगदिनाची संकल्पना "एक पृथ्वी एक आरोग्य" अशी  होती, योगाभ्यास वर्तमान आणि भावी पिढ्यांचे सुखद भविष्य सुनिश्चित करण्यासाठी संपूर्ण जग एकत्रित आल्याचे पंतप्रधान यावेळी म्हणाले. विशाखापट्टणममधील मुख्य कार्यक्रमात २ लाख ७२ हजार लोकांनी सहभाग घेतला.

**<u>योगराज्य</u>**

अकराव्या योग दिनानिमित्त महाराष्ट्रात सरकारी संस्था, संघटना तसेच सामान्य नागरिकांच्या सहभागासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. राज्यपाल सी. पी. राधाकृष्ण यांनी राजभवनामध्ये झालेल्या योग दिन सोहळ्यात सहभाग घेतला. सर्व विद्यापीठांमध्ये योग अभ्यास सुरू करण्याबाबत कुलगुरूंशी चर्चा करणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

भक्ती आणि योग यांच्या माध्यमातून आरोग्यदायी समाजाची निर्मिती व्हावी यासाठी सर्वांनी  मिळून प्रयत्न करण्याचं आवाहन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केले. जागतिक योग दिनाच्या निमित्ताने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदी आणि श्री संत तुकाराम महाराज संस्थान देहू यांच्याद्वारे आयोजित 'वारकरी भक्तीयोग' कार्यक्रमात ते बोलत होते.

सर्वच जिल्ह्यांमध्ये विविध कार्यक्रमांचं तसंच योगसराव सत्रांचं आयोजन करण्यात आलं होतं. पालकमंत्री, खासदार, आमदार, जिल्हाधिकारी तसेच पोलीस अधीक्षक देखील या सरावांमध्ये सहभागी झाले होते.

युनेस्कोच्या वारसा स्थळ यादीत समाविष्ट असलेल्या राज्य वारसा स्थळांवरही योग प्रात्यक्षिकं सादर झाली.

मुंबईजवळच्या कान्हेरी लेणी, घारापुरी लेणी, बुलडाण्यातील गायमुख मंदीर, पुण्यातलं आगाखान पॅलेस, शिवनेरी किल्ला, छत्रपती संभाजीनगरमध्ये बिबी का मकबरा, अजिंठा लेण्या  आणि अमरावतीमध्ये बौद्धस्तूप इथं योग प्रात्यक्षिकं झाली.

हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात...

**<u>शहा</u>**

भारत, पाकिस्तानसोबतचा सिंधू पाणी करार कधीही पुनःस्थापित करणार नाही असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी स्पष्ट केलं आहे. राजस्थानमधून पाकिस्तानला जाणारं अतिरिक्त पाणी वाहून नेण्यासाठी सरकार एक कालवा बांधेल असंही ते म्हणाले.

एका इंग्रजी दैनिकाला दिलेल्या मुलाखतीत गृहमंत्र्यांनी सांगितलं की, दहशतवादाविरुद्ध शून्य सहनशीलतेचं सरकारचं धोरण अबाधित आहे. सरकार दहशतवादाच्या मूळ कारणांवर लक्ष केंद्रात करत आहे, मग ते काश्मीर असो, नक्षलवादी भागात असो किंवा ईशान्येकडील असो असंही शहा यांनी स्पष्ट केलं.

ते म्हणाले की, भारत केवळ सर्वात सुरक्षित आणि सर्वोत्तम नाही तर जगात गुंतवणूक करण्यासाठी एक आदर्श ठिकाण आहे. भारत हा पारदर्शक धोरणं आणि मोठी ग्राहक बाजारपेठ असलेला लोकशाही देश आहे. सरकारनं २०१४ पासून विकासाची फळं देशभर समान रीतीनं वाटण्यासाठी कठोर परिश्रम केले आहेत अशी पुष्टि शहा यांनी केली. भारत जागतिक आर्थिक महासत्ता बनण्यास सज्ज असल्याचं सांगून गृहमंत्री म्हणाले की, देशातील बँकिंग क्षेत्रातील सुधारणा आणि गरिबांचा आर्थिक समावेश हे जगासाठी अभ्यासण्यासारखे एक आदर्श उदाहरण आहे.

**<u>डीजीसीए</u>**

नागरी विमान वाहतूक महासंचालनालयानं एअर इंडियाला गंभीर उल्लंघनांसाठी कर्मचारी वेळापत्रक आणि रोस्टरिंगशी संबंधित सर्व भूमिका आणि जबाबदाऱ्यांमधून तीन अधिकाऱ्यांना तत्काळ काढून टाकण्याचे निर्देश दिले आहेत. या अधिकाऱ्यांविरुद्ध विलंब न करता अंतर्गत शिस्तभंगाची कारवाई सुरू करण्याचे आणि अशा कारवाईचा निकाल दहा दिवसांच्या आत कळविण्याचे निर्देशही डीजीसीएनं दिले आहेत. हे अधिकारी कार्यान्वयन त्रुटींसाठी जबाबदार असल्याचं डीजीसीएनं एका निवेदनात म्हटलं आहे.

**<u>श्रीलंका</u>**

ऑपरेशन सिंधू अंतर्गत भारतीय नागरिकांसह इराणमधून श्रीलंकेच्या नागरिकांना बाहेर काढण्यात वेळेवर मदत केल्याबद्दल श्रीलंकेनं भारत सरकारचे आभार मानले आहेत. श्रीलंकेच्या परराष्ट्र मंत्रालयानं समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे की, एकतेचं हे कृत्य श्रीलंका आणि भारत यांच्यातील भक्कम आणि चिरस्थायी भागीदारीचं उदाहरण आहे आणि श्रीलंकेच्या लोकांनी त्याचं मनापासून कौतुक केलं आहे.

**<u>अमेरिका-इराणहल्ला</u>**

इराण-इस्रायल संघर्षात हस्तक्षेप करत आता इस्रायलसोबत अमेरिका अधिकृतपणे सहभागी झाली आहे. अमेरिकेनं इराणच्या तीन आण्विक तळांवर हल्ला केला असून, हा हल्ला केल्यानंतर अमेरिकेची सर्व विमानं इराणी हवाई हद्दीबाहेर आहेत, असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाजमध्यमावरील संदेशातून जाहीर केलं आहे.

**<u>ब्रिटन-सहाय्यित मृत्यु</u>**

ब्रिटनच्या हाऊस ऑफ कॉमन्सनं सहाय्यित मृत्यूला कायदेशीर मान्यता देणारं विधेयक मंजूर केलं आहे, याद्वारे समाजात मोठ्या सामाजिक बदलाचा मार्ग मोकळा झाला आहे. या विधेयकाद्वारे इंग्लंड आणि वेल्समधील मानसिकदृष्ट्या सक्षम, सीमांत आजारी प्रौढांना, म्हणजे ज्यांना जगण्यासाठी सहा महिने किंवा त्यापेक्षा कमी कालावधी शिल्लक आहे, त्यांना वैद्यकीय सहाय्यानं त्यांचं जीवन संपवण्याचा अधिकार मिळणार आहे. सहाय्यित मृत्यु इच्छामरणापेक्षा भिन्न आहे. हे विधेयक आता अधिक छाननीसाठी हाऊस ऑफ लॉर्ड्समध्ये जाईल.

**क्रिकेट**

लंडनमध्ये लीड्समधील हेडिंग्ले इथं सुरू असलेल्या अँडरसन - तेंडुलकर करंडक पाच सामन्यांच्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारताच्या पहिल्या डावातील ४७१ धावांना प्रत्युत्तर देताना इग्लंडनं 3 गडी बाद 209 धावा केल्या. भारताच्या पहिल्या डावात यशस्वी जयस्वाल, कर्णधार शुभमन गिल, उपकर्णधार ऋषभ पंत यांनी सुंदर शतकं झळकावली. भारताचे उर्वरित गडी धावांची फार भर टाकू शकले नाहीत.

**हवामान**

कोकण आणि मध्य महाराष्ट्राच्या  घाट प्रदेशात मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. तर विदर्भात जोराचे वारे आणि वीजांसह पाऊस पडेल.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.